# नियमित दिवाणी दावा क्र.१९०/२०१४ मधील निशाण क्र.१ खालील आदेश

[ CNR No.MHKO090002992014 ]

दिनांक ११.०६.२०२५ रोजी नि.१६६ वर आदेश पारीत करत असताना पुढील तारखेस कुठल्याही परिस्थितीत प्रकरणास तहकुबी देण्यात येणार नाही, याबद्दल स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. नि.१५६, १६४ व १६९ वरील अर्ज बघता सदरील अर्ज हे दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीवर त्रयस्थ इसमांचा अधिकार प्रस्थापित करू नये, याकरिता असल्याचे दिसतात. प्रतिवादी क्र.६ ते ९ यांचा पुरावा देण्याचा अधिकार संपुष्टात आणल्याने प्रकरण हे अंतिम युक्तिवादाला ठेवण्यात आले आहे. सबब अंतरिम अर्ज निकाली काढण्याऐवजी सर्व पक्षकारांना आदेशीत करणेत येते की, त्यांनी पुढील तारखेस न चुकता प्रस्तुतच्या प्रकरणी आपला अंतिम युक्तिवाद सादर करावा. अन्यथा त्यांना प्रस्तुतचे प्रकरणात युक्तिवाद करणेचा नाही, असे गृहीत धरून गुणदोषावर न्यायनिर्णय करणेत येईल.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.06.27 17:46:26 +0530

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : २७.०६.२०२५.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज